गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८



दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष २ रे ● अंक ३४ वा ● गुरुवार २० जून २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 2 | Issue 34 | Date : 20/06/2024 blow Thursday Page 4 Price 4


## केंद्र सरकारची शेतकऱ्यांसाठी मोठी घोषणा! १४ पिकांच्या किमान आधारभूत किंमतीत केली मोठी वाढ

### मोदी सरकारच्या या निर्णयाचा शेतकऱ्यांना मोठा फायदा होणार

असे आहेत एमएमसपीचे नवे दर (प्रति क्विंटलमध्ये )

१) नाचणी – २४९० रुपये
२) बाजरी – २६२५ रुपये
३) सोयाबीन – ४८९२ रुपये
४) मुग – ८६९२ रुपये
५) तूर – ७५५० रुपये
६) तिळ – ९२६७ रुपये
७ भात – २३०० रुपये
८) ज्वारी – ३३७१ रुपये
९ ) उडीद – ७४०० रुपये
१० )कापूस – ७१२१ रुपये
११) भुईमुग – ६७८३ रुपये
१२) रेप सीड – ८७१७ रुपये
१३) मका – २२२५ रुपये
१४) सूर्यफुल – ७२८० रुपये



**नवी दिल्ली/दैनिक यशसिध्दि न्यूज :** बुधवारी केंद्रीय मंत्रिमंडळाची दुसरी बैठक पार पडली असून या बैठकीत शेतकऱ्यांसाठी मोठा निर्णय घेण्यात आला आहे. या बैठकीत केंद्र सरकारने १४ पिकांच्या किमान आधारभूत किंमतीत (एमएसपी) मोठी वाढ केली आहे. मोदी सरकारच्या या निर्णयाचा शेतकऱ्यांना मोठा फायदा होणार आहे. आज मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर झालेल्या पत्रकार परिषदेत केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी यासंदर्भात माहिती दिली. पंतप्रधान मोदी यांनी नेहमीच शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य दिलं असून आजच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत शेतकऱ्यांच्या दृष्टीने बैठकीत महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत, असे ते म्हणाले.

पुढे बोलताना त्यांनी १४ पिकांच्या किमान आधारभूत किंमतीत वाढ केल्याची माहिती दिली. । पान २ वर

## पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्याकडून २५० कोटीच्या एकात्मिक पर्यटन विकास आराखडयास मान्यता

**✻ जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्याकडून उजनी धरण जल पर्यटन, कृषी पर्यटन,धार्मिक पर्यटन व विनयार्ड पर्यटन असे चार मुख्य घटक अंतर्भूत असलेला सोलापूर जिल्ह्याचा एकात्मिक पर्यटन विकास आराखडा सादर केला ✻ जिल्हा प्रशासनाच्या वतीने राज्य शासनाला आजच एकात्मिक पर्यटन विकास आराखडा सादर करण्यात येणार**




**✻जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद व आमदार संजय शिंदे यांच्यामुळे पर्यटन आराखड्याला गती : जिल्ह्याचा एकात्मिक पर्यटन विकास आराखडा तयार करणे व त्या अनुषंगाने सर्व बाबींची पूर्तता करणे या कामास मागील दहा वर्षांपूर्वी सुरुवात झालेली होती परंतु काही कारणामुळे हा आराखडा मार्गी लागत नव्हता. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी जुलै २०२३ मध्ये जिल्हाधिकारी पदाचा कार्यभार घेतल्यानंतर पर्यटन आराखडा कामास गती आली. जिल्हा प्रशासनाच्या वतीने जिल्ह्याची भौगोलिक परिस्थिती पाहून त्यादृष्टीने पर्यटन विकास आराखड्यात महत्त्वपूर्ण चार घटक अंतर्भूत केले व त्या पार्श्र्वभूमीवर विविध स्तरावर अभ्यास करून एक परिपूर्ण एकात्मिक पर्यटन विकास आराखडा तयार करण्यात आला. यासाठी करमाळ्याचे आमदार संजय शिंदे यांनीही पाठपुरावा केला.**

**सोलापूर/दैनिक यशसिध्दि न्यूज**

जागतिक पर्यटनाच्या नकाशावर सोलापूर जिल्ह्याला आणून स्थानिक स्तरावर मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती करणे यासाठी जिल्ह्याच्या भौगोलिक परिस्थितीचा लाभ घेऊन जल, कृषी, धार्मिक व विनयार्ड पर्यटनाच्या अनुषंगाने विविध सोयी सुविधा निर्माण करण्यासाठी प्रशासनाकडून सुमारे २५० कोटीचा एकात्मिक पर्यटन विकास आराखडा सादर केला आहे. त्यास मान्यता देण्यात येत असून यावर्षीच्या अंदाजपत्रकात निधी उपलब्ध करून देण्यासाठी शासन कटिबद्ध राहील, अशी ग्वाही पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली.जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात एकात्मिक पर्यटन विकास आराखडा मान्यतेच्या अनुषंगाने आयोजित बैठकीत पालकमंत्री चंद्रकांत पाटील बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, खासदार प्रणिती शिंदे, खासदार धैर्यशील मोहिते पाटील, आमदार सुभाष देशमुख, आमदार संजय शिंदे, निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता संजय माळी आदी उपस्थित होते.

पालकमंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले की पर्यटनाच्या दृष्टीने सोलापूर जिल्ह्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. आपण या आराखड्याला मान्यता देत असून यासाठी आवश्यक असलेला निधी राज्य शासन उपलब्ध करून देईल, त्याबाबतचा मागणी प्रस्ताव तात्काळ सादर करावा व याच अधिवेशनातील अंदाजपत्रकात या आराखड्यासाठी टोकन निधी उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. तसेच या आराखड्यातील सोयी सुविधा जागतिक दर्जाच्या निर्माण करण्यात येणार असल्याने अशा सुविधा देणाऱ्या संस्थांची निवड करावी. या प्रस्तावित केलेली सर्व कामे उत्कृष्ट दर्जाची होऊन देश विदेशातील पर्यटकांना समाधानकारक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. याच अनुषंगाने स्थानिक स्तरावर मोठ्या प्रमाणावर । पान २ वर

## शिंदे गटाचा देवेंद्र फडणवीसांना घरचा आहेर!

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

शिवसेनेचा ५८ वा वर्धापन दिन बुधवारी पार पडला. या वर्धापन दिनाचे दोन मेळावे झाले. एक उद्धव ठाकरेंचा तर दुसरा एकनाथ शिंदेंचा. वरळीतल्या डोम सभागृहात एकनाथ शिंदेंनी मेळावा घेतला. तर षण्मुखानंद हॉल या ठिकाणी उद्धव ठाकरेंचा मेळावा पार पडला. यावेळी उद्धव ठाकरेंनी एकनाथ शिंदेंवर, भाजपावर जोरदार निशाणा साधला. तर एकनाथ शिंदेंनीही त्यांना प्रत्युत्तर दिलं.



पक्ष फोडायचे, सरकार पाडायचं, फोडलेल्या लोकांना मंत्रिपदं द्यायची हा लोकशाहीची हत्या करणारा नक्षलवाद आहे. आज मी मिंधे आणि भाजपाला आव्हान देतोय जर तुम्ही षंढ नसाल तर शिवसेनाप्रमुखांचा फोटो न लावता, माझ्या शिवसेनेचं चिन्ह न चोरता माझ्यासमोर निवडणूक लढून दाखवा. नाहीतर षंढ म्हणून फिरा, विजेते म्हणून फिरु नका. मला एका गोष्टीचा अभिमान नक्की आहे की आम्ही बाळासाहेब ठाकरेंचाच फोटो वापरला दुसऱ्या कुणाचाही फोटो वापरला नाही. आज काँग्रेसच्या दावणीला बांधलेली शिवसेना सोडवण्यासाठी आणि बाळासाहेब ठाकरे यांचे विचार जपण्यासाठी दोन वर्षांपूर्वी आपण उठाव केला. तो उठाव योग्य होता हे या निवडणुकीमध्ये जनतेने दाखलं. आपण घेतलेला निर्णय कसा योग्य होता. हे आपण निवडणुकीमध्ये पाहिलं. जनतेच्या विश्र्वासाला आपण कधाही तडा जाऊ देणार नाही, हा शब्द मी देतो. आज बाळासाहेब ठाकरे असते तर काय म्हणाले असते? जमलेल्या माझ्या तमाम हिंदू बांधवांनो, भगिनींनो आणि मातांनो. आज त्यांचा वारसा सांगणाऱ्यांना हिंदू म्हणून घेण्याची लाज वाटू लागली, असं जोरदार प्रत्युत्तर एकनाथ शिंदेंनी दिलं. मात्र याच मेळाव्यात रामदास कदम यांनी देवेंद्र फडणवीसांना घरचा आहेर दिला आहे. तोदेखील अजित पवारांच्या महायुतीत येणाऱ्यावरुन.

अजित पवारांनी सत्तेत सहभागी होण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे आमच्या आमदारांना मंत्रिपदापासून। पान २ वर

## यूजीसी नेट परीक्षा रद्द; पेपर फुटल्याचा संशय, शिक्षण मंत्रालयाने दिली माहिती

**नवी दिल्ली/दैनिक यशसिध्दि न्यूज**

मंगळवारी ( १८ जून रोजी ) झालेली यूजीसी नेट परीक्षा रद्द करण्यात आली आहे. ही परीक्षा पुन्हा एकदा नव्याने घेतली जाणार आहे. केंद्र सरकारच्या शिक्षण मंत्रालयाने परिपत्रक काढत यासंदर्भातील निर्णय जाहीर केला आहे. पेपर फुटल्याचा संशय असल्याने तसेच या परीक्षेची पारदर्शकता आणि पाविघ्र्य सुनिश्र्चित करण्यासाठी ही परीक्षा रद्द करण्यात आल्याचं शिक्षण मंत्रालयाकडून सांगण्यात आलं आहे.शिक्षण मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, यूजीसी नेट परीक्षा रद्द करण्यात आली आहे. तसेच ही परीक्षा पुन्हा नव्याने घेतली जाणार आहे. नव्याने घेतली जाणारी ही परीक्षा नेमकी कधी होईल, यासंदर्भात लवकर निर्णय जाहीर करण्यात येईल, असं सांगण्यात आलं आहे. याबरोबरच या प्रकरणाचा तपास सीबीआयकडे सोपविण्यात आला असून पेपर लीक प्रकरणाची सखोल चौकशी केली जाईल असंही शिक्षण मंत्रालयाने जाहीर केलं आहे.




## पालखी मार्गावरील सर्व कामे जास्तीचे कामगार लावून वेळेत पूर्ण करा : पालकमंत्री चंद्रकांत पाटील




**✻ वारीच्या पार्श्र्वभूमीवर करण्यात येणाऱ्या कामांसाठी नियोजन मधून निधी उपलब्ध करणार ✻ जिल्हाधिकारी आशीर्वाद यांच्याकडून आषाढी वारीच्या अनुषंगाने प्रशासनाने केलेल्या तयारीची माहिती बैठकीत सादर**

**सोलापूर/दैनिक यशसिध्दि न्यूज**

श्री संत ज्ञानेश्र्वर व श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यासह अन्य संतांच्या पायी दिंडी पालखी सोहळ्याबरोबर मोठ्या प्रमाणात वारकरी भाविक चालत येतात. पायी पालखी सोहळ्याबरोबर येणाऱ्या वारकऱ्यांना कोणताही त्रास होऊ नये, यासाठी पालखीमार्गावरील सर्व कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी जास्तीचे कामगार लावावेत, अशा सूचना उच्च व तंत्र शिक्षण, वस्त्रोद्योग व संसदीय कार्यमंत्री तथा पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिल्या. आषाढी वारी पूर्व नियोजनाबाबत नियोजन भवन सोलापूर येथील बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, खासदार धैर्यशील मोहिते पाटील, आमदार सुभाष देशमुख, आमदार समाधान आवताडे, पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर, निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, उपजिल्हाधिकारी महसूल अमृत नाटेकर, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार,सा.बां. अधिक्षक अभियंता संजय माळी, प्रांताधिकारी सचिन इथापे, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, मुख्याधिकारी प्रशांत जाधव, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे केशव घोडके यांच्यासह सर्व संबंधित विभाग प्रमुख उपस्थित होते.

यावेळी पालकमंत्री पाटील म्हणाले, आषाढी वारी पालखी सोहळ्यात पालखी मार्ग, पालखी तळ, विसावा, रिंगण सोहळा या ठिकाणी पाणी, आरोग्य, स्वच्छतेच्या सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात. यासाठी योग्य दक्षता घेऊन प्रत्येक विभागांने नियोजन करावे. भंडीशेगाव येथील पालखी तळावर पाणी साठणार नाही यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात. याबाबत राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण व बांधकाम विभागाने समन्वयाने काम करावे. या कामासाठी लागणारा निधी जिल्हा नियोजन मधून उपलब्ध करण्यात येईल. वारी कालावधीत भाविकांना कोणत्याही समस्येच्या अनुषंगाने अधिकाऱ्यांना संपर्क साधताना अडचणी येऊ नये यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करावा, अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

आषाढी यात्रा सोहळ्यात वारकऱ्यांना । पान २ वर

## पेट्रोल पंपावर मापात पाप भेसळ पेट्रोलने गाड्याचे मेन्टनस वाढल..!

### प्रतिलीटर एव्हरेज घटले..! पंपवार कर्मचाऱ्याची ग्राहकाशी हुज्जत वाढली..!



**अक्कलकोट/दैनिक यशसिध्दि न्यूज**

येथील अनेक पेट्रोल पंपावर भेसळ पेट्रोल मापात पाप... मिटर पळवणे यामुळे ग्राहकाचे पेट्रोल पंपावरील कर्मचाऱ्याशी तक्रारीचे प्रमाण वाढले आहे. पेट्रोल पंपावरील मीटरची तपासणी भेसळ पेट्रोल तपासणी व्हावी. मीटर पळवून रोज हजारो ग्राहकाची मोठी आर्थिक लुट होत असल्याची तक्रार नागरिकातुन होत आहे. येथील सर्वच पेट्रोल पंपावर मीटर पळवुन कमी पेट्रोल वितरीत करून रोज अनेक ग्राहकाची मोठी आर्थिक लुट होत आहे. १लीटर च्या पाण्याच्या बाटली त १लीटर पेट्रोल घेतल्यास बाटली कधीच भरून मिळत नाही. सर्वच पेट्रोल पंपावरील मीटरची तपासणी पेट्रोल शुद्धता याची तपासणी व्हावी. अनेक गाड्याचे भेसळ पट्रोल मुळे मेन्टनस वाढले आहे प्रतिलीटर गाड्याचे ऐवरेज कमी झाले आहे पट्रोल पंपावर कर्मचारी व ग्राहकाच्या मापाबाबत मोठ्या तक्रारीचे प्रमाण वाढले आहे.येथील पंचायत समिती समोरील पेट्रोल पंपावर कर्मचारी ग्राहकाशी मोठी हुज्जत अरेरावी ची भाषा वापरणे असे प्रकारही वाढले आहेत ग्राहकाशी सौजन्याने वागणे बाबत कर्मचाऱ्यानां प्रशिक्षण देणे आवश्यक असल्याचे मत नागरिकातुन बोलले जात आहे याबाबत भारत पेट्रोलियम कंपनीने ग्राहकानां भेसळ विरहित योग्य किंमतीचे योग्य मापात पेट्रोल वितरण व्यवस्था कार्यान्वित करावी ग्राहकाना पंपांवरील कर्मचारी यांच्यात सुसंवाद रहावा असे कर्मचाऱ्याचे वर्तन रहावे असे मत ग्राहकातून व्यक्त होत आहे.

# संपादकीय

## लढाई जनतेला लढत..

गेल्या दहा वर्षांपासून सत्तेत असलेल्या नरेंद्र मोदींना यंदा चारशे पारची ओढ लागली होती. २०१४ मध्ये २८२, २०१९ मध्ये ३०३ आणि २०२४ मध्ये भाजपला चारशे पार खासदार पाहिजे होते. मात्र, भारतीय मतदारांनीत्यांना बहुमताच्याही जवळ फिरकू दिले नाही. नरेंद्र मोदी आणि भाजपचा हा नैतिक पराभव असल्याचे आता म्हटले जात आहे. कारण चंद्राबाबू, नितीशकुमार, शिंदे, चिराग पासवान यांना निवडणुकीच्या आधीच सोबत घेतल्यामुळे त्यांच्या खासदारांच्या बळावर एनडीएचे सरकार आले आहे. त्यामुळे हा मोदी-शहांचा पराभवच आहे. मोदींना जनतेने नाकारलेले आहे. आकड्यांच्या खेळात मोदी विजयी झाले असले तरी जनादेश यांना मिळालेला नाही. भाजप आणि त्यांचे सहकारी पक्ष, भाजपला कमी जागा येण्यासाठी इंडिया आघाडीच्या संविधान बदलाच्या प्रचाराला जबाबदार धरत आहेत. एक खोटा नॅरेटिव्ह क्रिएट केला गेला आणि मतदारांना संभ्रमित केले गेले, असे सर्रास भाजप आणि एनडीए घटक पक्षांकडून सांगितले जात आहे. भाजप नेत्यांनी लोकसभा निवडणुकीची घोषणा होण्यापूर्वीच २०२४ मध्ये चारशे पारचा नारा दिला होता. देशात कोणालाही सरकार स्थापन करायचे असेल तर २७२ खासदार असणे आवश्यक आहे. बहुमताचा हा आकडा गेल्या दोन निवडणुकांमध्ये भाजपने मिळवला होता. असे असतानाही भाजपला चारशे पार जागा का पाहिजे, याचे उत्तर मोदी सरकारमधील मंत्री अनंतकुमार हेगडे यांनी दिले होते. भाजपला त्यांचा हिंदुत्वाचा अजेंडा राबवण्यासाठी चारशे पार जागा हव्या आहेत. भूतकाळात काँग्रेस नेत्यांनी हिंदुत्वाला समोर न ठेवता भारतीय संविधान तयार केले, त्यात काही बदलही केले. आपला धर्म वाचवायचा असेल तर संविधानात बदल करायला हवा. आपल्याकडे सध्या दोन तृतीयांश बहुमत आहे. मात्र, संविधान बदलासाठी राज्यसभेतही बहुमत हवे. त्यासाठी चारशे पार जागा हव्या आहेत. संविधान बदलाचे हे थेट वक्तव्य हेगडे यांनी केले होते. त्यामुळे भाजप आणि एनडीएमधील घटक पक्षांचे नेते कितीही म्हणत असले की संविधान बचावचे नॅरेटिव्ह सेट करण्यात आले, पण त्याला सत्ताधाऱ्यांकडून वास्तवाची जोड मिळत गेल्यामुळेच जनतेने त्यांना नाकारले. संसदेत संविधानापुढे नतमस्तक होऊन संविधानाचे रक्षण होणार नाही, तर संविधानातील मूळ तत्त्वे लोक कल्याणकारी योजनांच्या माध्यमातून जनतेच्या दारापर्यंत न्यावी लागतील. त्यासोबतच संविधानाच्या रक्षणाची लढाई जनतेला लढत राहावी लागणार आहे.

# वयात येणाऱ्या मुलांसाठी बापाने आवर्जून लिहावे असे पत्र..

बाप खऱ्या अर्थाने घराचा कणा आणि बाणा........ हृदयात चोहीबाजूने भरलेला कणवाळू पणा पण कुटूंब संस्कारीत व शिस्तीत राहावे यासाठी वरवर दाखवावा लागणारा कणखर बाणा हा त्याला कदाचित त्याच्या कुटुंबात त्याची प्रतिमा ही राकट आणि रागीट बनवणारा असेलही पण एक बाप म्हणून त्याच्या जागी तो योग्यच असतो हे मुलगा बाप झाल्यावर समजते. पण तेव्हा कदाचित उशीर झालेला असतो. पण एक बाप म्हणून काही गोष्टी त्यानेही मुलगा वयात येताना त्याला आवर्जून सांगितल्या पाहिजेत. बाळा हे नक्की वाच! तुला वेळ मिळेल तेव्हा का होईना पण नक्की वाच... आज तुला मी जे काही बोलणार त्याचा बारकाईने विचार कर. आयुष्य फार सुंदर पण तितकेच क्षणभंगूर आहे. तेव्हा आयुष्य जगताना प्रत्येक बाबीचा विचार बारकाईने विचार कर.विश्र्वास टाकण्याची घाई करू नकोस...! जगणं कशानेच कुणामुळेच थांबत नाही. त्यामुळे माणसं तुला सोडून जातील. नाकारतील, झिडकारतील किंवा ज्यांच्यावर तू जीव तोडून प्रेम केलंस तेच तुझ्या आयुष्यातून निघून जातील. तेव्हा हेच कायम लक्षात ठेव की, कुठल्याही माणसामुळे आपलं जगणं थांबत नाही. कधीच नाही....!! आयुष्य फार छोटं आहे आणि तीच तुझी खरी पुंजी आहे. त्यामुळे आज वाया घालवलास तर उद्या कदाचित जगणंच तुला सोडून जाईल. त्यापेक्षा आज मनापासून, भरभरून जग. आनंदी राहा...!! प्रेम ही एक क्षणिक आणि चंचल भावना आहे. ती काळाप्रमाणे आणि मूडप्रमाणेही बदलते. ज्यांच्यावर तू जिवापाड प्रेम करतोस तेच समजा तुला सोडून गेले तर जरा धीर धर. वाईट विचारांची घाई करू नकोस.. मनात आलाही वाईट विचार तर घट्ट डोळे मिटून एकदा आपल्या आईचा, माझा, ताईचा, भावाचा जरूर विचार कर कि त्यांच्या साठी तू किती मौल्यवान आहेस आणि हो बाळा, काळाच्या मलमानें या जखमाही भरून निघतील. प्रेमात पडलास म्हणजे तेच सगळ्यात सुंदर आणि अतीव चांगलं असं समजू



नकोस आणि प्रेमभंग झाला म्हणून त्या दुःखालाही जास्त कवटाळून बसू नकोस...!! एखाद्या वेळी एखाद्या बाबतीत अपयश आलेच तर लगेच टोकाची भूमिका घेऊ नकोस. काळ हा प्रत्येक गोष्टीचे औषध आहे. आणि विजयाने जास्त हुरळूनही जाऊ नकोस. प्रत्येक बाबतीत संयम धरायला शिक. अनेक यशस्वी माणसांनी शिक्षण अर्धवट सोडलं, तरी ते यशस्वी झाले अशा कहाण्या तू वाचल्या असशीलच ! पण याचा अर्थ असा नाही की, एक शिक्षण सोडलं की तूही यशस्वी होशील. ज्ञान हे एक शस्त्र आहे हे लक्षात ठेव.मिळेल त्या गोष्टीतून ज्ञान मिळवण्यासाठी प्रयत्न कर. शून्यातून विश्र्व निर्माण करता येते हेहि खरंय, पण कुठल्या तरी शून्यापासून आधी सुरुवात तर करायला लागतेच ना...!! माझी अपेक्षाच नाही की मी म्हातारा झाल्यावर तू मला सांभाळावंसं. मीही तुला जन्मभर पोसणार नाहीच. तू स्वतःच्या पायावर उभा राहू शकशील तो पर्यंत माझा तुला खंबीर पाठिंबा आहेच. त्यानंतर तुला बसमधून फिरायचं की स्वतःच्या चार चाकितून मधून........गरीबच राहायचं की श्रीमंत व्हायचं हा निर्णय तुझा तू घ्यायचा...!! आणखी एक मीही अनेकदा लॉटरीचं तिकीट काढलं, ते कधीच लागलं नाही.एका रात्रीत श्रीमंत होता येत नाही. श्रीमंत व्हायचं तर मेहनत करावीच लागते. जगात फुकट कधीच काहीच मिळत नाही. .! म्हणजे मला म्हणायचं कि जीवनात शॉर्टकट खूप धोक्याचा आहे बाळा हि गोष्ट तू आवर्जून लक्षात ठेव. वाम मार्गाचा वापर तर अजिबात करू नकोस. जग खूप मोठे आहे. नुकताच तू त्याची पहिली पायरी चढलास अजून तुला खुप भ्रमंती करायची आहे. त्यात तुला आनंद देणारे व चटके देणारे अनुभव मिळतील. त्यामुळे त्यात तुझ्यातील प्रगल्भतेचा कस लागेल.तेव्हा आमचे संस्कार व तुझं ज्ञान व आजवरचा अनुभव व आपली परिस्थिती याची योग्य सांगड घाल आणि भविष्याकडे योग्य दिशेने वाटचाल कर.मी आणि तुझ्या आई ने तुला लहानचा मोठा करायला खूप कष्ट घेतले बाळा... प्रसंगी उपाशी राहून तुझा हट्ट पुरवला... तुला आठवते का कि तुझ्या वाढदिवसाच्या दिवशी मी कामावरून लवकर घरी आलो नाही तर तू रुसला आणि वाढदिवस साजरा केला नाही. माझ्याशी बोलला नाही पण बाळा खरंच त्या दिवशी मीही माझ्या परिस्थिती वर खूप रडलो कारण तुझे कपडे व केक घेण्यासाठी मी जे ॲडव्हान्स पैसे घेतले होते ना त्याचाच ओव्हर टाइम मी करत होतो बाळा..... मी जे दुःख भोगले ते तुझ्या वाट्यावर येऊ नये यासाठी मी आणि तुझी आई अहोरात्र मेहनत करतो आहे बाळा. प्रसंगी रागावलो असेल, शिक्षा केली असेल तर ते तुझे भले व्हावे यासाठीच बाळा.. तू तूझ्या साठी जेवढा मौल्यवान आहेस न....तेवढाच आमच्यासाठीही बाळा... सोशल मीडियाच्या जास्त आहारी न जाता, वास्तविकतेवर भर दे. रिल्सच्या दुनियेत न जगता तू रियल लाईफ जग बाळा. खूप शिक, यशवंत हो, औक्षवंत हो आणि कायम चांगल्या विचारांच्या मित्रांच्या व लोकांच्या संगतीत राहा, एवढीच तुझ्याकडून एक बाप म्हणून निरपेक्ष अपेक्षा.....

बाळा......कदाचीत तुला हे पाठविलेले पत्र आवडेल कि नाही हे माहीत नाही पण हे पत्र तुझ्या आयुष्याची शिदोरी नक्की आहे.म्हणुन बाळा हे पत्र तुला आवडो वा ना आवडो लगेच फेकुन देऊ नकोस या पत्राला तु नेहमी तुझ्या जवळ ठेव व वेळ मिळेल तेंव्हा पुन्हा पुन्हा वाच .....!!

**फक्त तुझेच वडील**
**संदीप साहेबराव वनवे (स.शि.)**
**श्री. औंढेश्र्वर विद्यालय अंढेरा.**
**ता. देउळगाव राजा जि. बुलढाणा.**



पान १ वरुन

## २५० कोटीच्या एकात्मिक पर्यटन

बाजारपेठ निर्माण असल्याने या भागातील नागरिकांना मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध होणार असल्याने हा पर्यटन आराखडा खूपच महत्वपूर्ण असल्याचे श्री. पाटील यांनी सांगितले.

पुणे येथे उपमुख्यमंत्री तथा वित्त नियोजन मंत्री अजित पवार यांच्याकडे प्राथमिक स्तरावर जिल्ह्याच्या पर्यटन विकास आराखड्याचे सादरीकरण करण्यात आले व यावेळी उपमुख्यमंत्री महोदयाकडून या बजेटमध्ये तरतूद केली जाणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिली. आज आपल्याकडून या आराखड्यास मान्यता मिळाल्याने जिल्हा प्रशासनाच्या वतीने आजच राज्य शासनाला आराखडा सादर करण्यात येईल. तसेच उजनी धरणात जल पर्यटन, ९४ धार्मिक स्थळे असल्याने धार्मिक पर्यटन, कृषी क्षेत्रात अग्रेसर असल्याने कृषी पर्यटन तसेच विनयार्ड पर्यटन विकसित होण्यासाठी पायाभूत सोयी सुविधा निर्माण केल्यास जिल्ह्याचा पर्यटनाच्या दृष्टीने सर्वांगिण विकास होऊन येथे देश विदेशातील पर्यटकांची संख्या वाढून मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होऊन स्थानिक नागरिकांची आर्थिक उन्नती होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

सोलापूर जिल्ह्याची भौगोलिक रचना खूप महत्त्वपूर्ण आहे. जिल्हा रेल्वे व रस्त्याने जोडलेला आहे. हा जिल्हा मंदिराचा जिल्हा असून येथे ९४ पर्यटन स्थळे आहेत. उजनी धरण निसर्गरम्य आणि पक्षी निरीक्षणासाठी प्रसिद्ध असून येथे अक्वॉटिक टुरिझम तसेच वॉटर स्पोर्ट टुरिझम मोठ्या प्रमाणावर विकसित होऊ शकते. उजनी धरणाचे ९० किलोमीटर लांबीचे पात्र असून पात्राची रुंदी जवळपास सहा किलोमीटर आहे. येथे पर्यटकांना गोड्या पाण्याचा समुद्र अनुभवयला मिळणार आहे. तसेच या ठिकाणी देशातील सर्वात मोठा जलतरण तलाव प्रस्तावित करण्यात आलेला आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिली.

या प्रकल्पांतर्गत उजनी धरण परिसरात पाटबंधारे विभागाच्या जागेवर मोठे पॅव्हेलियन निर्माण करण्यात येऊन यात माहिती, तिकीट केंद्र व प्रतीक्षलाय उभारण्यात येणार आहे. मनोरंजन केंद्र, हॉटेल्स, १ हजार क्षमतेचे मोठे सभागृह, बोर्ड रूम,, रॉक पुल, सर्व वयोगटासाठी भारतातील सर्वात मोठा जलतरण तलाव, वॉटर फ्रंट डेक, लाईट हाऊस, बोट रॅम्प, मरीना बोट पार्किंग, वॉटर स्पोर्ट्स, फ्लाईंग वॉटर बोर्ड, बोट सफारी, क्रुझ सफारी, अक्वेटिक लाईफ यासह अन्य सुविधा पर्यटकांसाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत, असे आशीर्वाद यांनी सांगितले.

आपला सोलापूर जिल्हा हा धार्मिक पर्यटनात ही अग्रेसर असून पंढरपुरचे श्री विठ्ठल रुक्मिणी च्या दर्शनासाठी लाखो भाविक पंढरपूर येथे येत असतात. सोलापूरचे ग्रामदैवत श्री सिद्धेश्र्वर मंदिर, अक्कलकोटचे श्री स्वामी समर्थ मंदिर व कुडल-हत्तरसंग येथील संगमेश्र्वर मंदिर, बार्शीतील भगवंत मंदिर यांचा ही धार्मिक पर्यटन स्थळ अंतर्गत विकास केला जात असून या ठिकाणी येणारे भाविकांची संख्या ही मोठी आहे. त्याप्रमाणे च उजनी धरण परिसर व जिल्ह्यात कृषी पर्यटनाचा लाभ घेता येऊ शकतो. यासाठी होम स्टे बैलगाडी सफारी, बफेलो राईड, स्थानिक व पारंपारिक सण साजरे करणे, लोककला, मासेमारी सह अन्य सुविधा पर्यटकांसाठी उपलब्ध करण्यात येतील. माळशिरस व करमाळा परिसरात विनयार्ड पर्यटन निर्माण केले जाऊ शकते. यामध्ये विन यार्ड, मनोरंजन, बायसिकल राईड, चीज टेस्टिंग, हॉटेल्स या सुविधा निर्माण करण्यात येतील, अशी माहिती जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिली.

उजनीच्या सर्वेक्षणास २० जून पासून सुरुवात होणार आहे. कृषी व विनयार्ड आराखडा ३० जुलै रोजी तयार होईल. प्रकल्प अहवाल व अंतिम सादरीकरण १५ ऑगस्ट २०२४ रोजी होणार आहे व त्यानंतर राज्य शिखर समिती ची मान्यता मिळून पुढील सहा महिन्याच्या काळात या प्रकल्पाचे काम सुरू होईल, असेही त्यांनी सांगितले.

पर्यटन प्रकल्पः सोलापूर जिल्हा हा भारतातील एकमेव असा जिल्हा आहे ज्या ठिकाणी जल, कृषी आणि ग्रामीण पर्यटन यांचे अनोखे मिश्रण आहे. उजनी धरण हा या पर्यटन आराखड्याचा केंद्रबिंदू आहे. हा प्रकल्प सुरू झाल्यानंतर सोलापूर जिल्ह्यात देशी विदेशी पर्यटकांच्या संख्येत खूप मोठ्या प्रमाणावर वाढ होणार आहे. या ठिकाणी विविध व्यवसायांची निर्मिती होऊन मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध होणार आहे. स्थानिक अर्थव्यवस्थेला मोठ्या प्रमाणावर चालना मिळवून येथील ग्रामीण जीवनमान यांच्यात बदल घडवून त्यांची आर्थिक उन्नती साधली जाणार आहे येथील लोकांना शाश्र्वत उत्पन्नाचा स्त्रोत कायमस्वरूपी उपलब्ध होणार असल्याने हा पर्यटन प्रकल्प होणे अत्यंत आवश्यक आहे.

## घोषणा! १४ पिकांच्या किमान

मंत्रिमंडळाने खरीप हंगामातील १४ पिकांसाठी वाढीव किमान आधारभूत किंमत मंजूर केली आहे. त्यानुसार, कापसाला ७१२१ रुपये, भाताला २३०० रुपये किमान आधारभूत किंमत मंजूर करण्यात आली आहे, असे त्यांनी सांगितले. तसेच १४ पिकांच्या किमान आधारभूत किंमतीत वाढ केल्याने सरकारच्या तिजोरीवर सुमारे २ लाख कोटी रुपयांचा भर पडले, अशी माहिती त्यांनी दिली.

२०१८ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात सरकारने शेतकऱ्यांना त्यांच्या पिकाच्या किंमतीच्या किमान दीडपट किमान आधारभूत किंमत दिली जाईल, असा धोरणात्मक निर्णय घेतला होता. त्यानुसारच मंत्रिमंडळाने किमान आधारभूत किंमतचे दर निश्र्चित केले आहेत, असेही ते म्हणाले.

किमान आधारभूत किंमत ही केंद्र सरकारतर्फे वेळोवेळी निश्र्चित करण्यात येत असलेली पिकांची/धान्यांची अथवा कृषी उत्पादनांची किंमत असते. त्यानुसार सरकार शेतकऱ्यांकडून धान्यखरेदी करते. हा निर्णय भारत सरकारचे केंद्रीय मंत्रीमंडळ घेत असते. कृषी उत्पादन खर्च व मूल्य आयोग अशा वाढीबाबत आपली शिफारस केंद्र सरकारला सादर करत असते. त्या शिफारसीनुसार केंद्रीय मंत्रीमंडळ आपला निर्णय जाहीर करते. या संबंधीची तरतूद त्या-त्या वर्षाच्या अर्थसंकल्पात पूर्वीच करण्यात आलेली असते. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत असणारा त्या धान्याचा भाव, मागील वर्षीचा खरेदी भाव, मागणी व पुरवठा, साधारणतः पेरणीचे क्षेत्र आदी अनेक गोष्टींवर ही किंमत ठरविली जाते.

## शिंदे गटाचा देवेंद्र फडणवीसांना

दूर रहावं लागलं. त्यावेळी शिंदे गटाच्या आमदारांनी जाहीर नाराजी व्यक्त केली होती. अजित पवार थोडे दिवस नसते आले तरीही चाललं असतं. असं रामदास कदम फडणवीसांना उद्देशून म्हणाले. तसंच एकनाथ शिंदेंना मुख्यमंत्री केल्याबद्दल त्यांनी आभारही मानले. मात्र अजित पवार महायुतीत आल्याने महायुतीतली नाराजी त्यांनी अशा पद्धतीने बोलून दाखवली आहे. आता यावर देवेंद्र फडणवीस काही उत्तर देणार का? हे पाहणं महत्त्वाचं असणार आहे. तसंच दस्तुरखुद्द अजित पवार यावर काय बोलणार? हे पाहणंही महत्त्वाचं असेल. रामदास कदम यांनी त्यांच्या भाषणात उद्धव ठाकरेंवरही टीका केली. शिवसेना ही उद्धव ठाकरेंना त्यांची प्रायव्हेट लिमिटेड कंपनी वाटते आणि शिवसैनिक त्यांचा गुलाम आहे असं वाटतं असं रामदास कदम म्हणाले.

## पालखी मार्गावरील सर्व कामे

केंद्रबिंदू मानून आषाढी वारीचे पूर्व नियोजन करण्यात आले आहे. आषाढी शुद्ध एकादशी सोहळा १७ जुलै २०२४ रोजी होणार असून, या सोहळ्यासाठी संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्र्वर महाराजांच्या पालखी सोहळ्याचे ११ जुलै तर जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्याचे १२ जुलै २०२४ रोजी सोलापूर जिल्ह्यात आगमन होणार आहे. पालखी सोबत येणाऱ्या वारकरी भाविकांना पालखी मार्ग, विसावा तसेच पालखी तळांवर आवश्यक असलेल्या सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. वारकरी भाविकांना तात्काळ सुविधा उपलब्ध व्हाव्यात तसेच सुरक्षेबाबत दक्षता घेण्यासाठी २५ हजार ५०० अधिकारी कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. तसेच ३४ आपत्ती प्रतिसाद प्रणाली कार्यान्वित करण्यात येणार आहे. पालखी तळावरील झाडे झुडपे काढणे, मुरमीकरण करणे, मुबलक व स्वच्छ पाणी पुरवठा, विद्युत पुरवठा आदीबाबत नियोजन करण्यात आले आहे. पालखी मार्गावर शुद्ध पिण्याच्या पाण्याचा पुरवठा हवा यासाठी व्यवस्थापनाचा कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. वारी कालावधीत सार्वजनिक व खाजगी २४ हजार ६८२ शौचालयांची उपलब्धता करण्यात येणार असून, शौचालय स्वच्छतेसाठी कर्मचाऱ्यांचा आवश्यक यंत्रणेची उपलब्धता करण्यात येणार आहे.

यंदा आषाढी सोहळ्यात नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येणार असून मंदिर व शहरातील प्रमुख रस्त्याच्या झाडावरती तसेच वाळवंटात विद्युत रोषणाई करण्यात येणार आहे. गर्दी व्यवस्थापन आणि शोध व बचावासाठी तीन ड्रोनचा वापर करण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सांगितले.

यावेळी जिल्हा पोलीस अधिक्षक सरदेशपांडे म्हणाले, पालखी सोहळा कालावधीत भाविकांना पायी चालताना कोणत्याही अडचणी येऊ नये तसेच वाहतूक व्यवस्था सुरळीत रहावी त्याचबरोबर कायदा सुव्यवस्थेचा प्रश्र्न निर्माण होऊ नये या दृष्टीने पोलिस प्रशासनाकडून काटेकोरपणे नियोजन करण्यात आले आहे. आषाढी यात्रा कालावधीत वाळवंट, महादर घाट, प्रदक्षिणामार्ग, नामदेव पायरी, चौपाळा,६५ एकर या गर्दीच्या ठिकाणी आवश्यक सुरक्षा व्यवस्था नेमण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी आमदार समाधान आवताडे यांनी वारी कालावधीत पंढरपूर शहरात शौचालयाची संख्या पुरेशी ठेवून सफाई कर्मचाऱ्यांची नियुक्ती दुप्पट प्रमाणात करावी, अशी मागणी करून भाविकांना सर्व प्रकारच्या सुविधा उपलब्ध कराव्यात असे सांगितले.

# संत लोटांगण महाराजांच्या पालखीची धुरा आता डाखोरे महाराजांकडे

**बुलढाणा / राहुल साबळे**

मेहकरच्या संत बाळाभाऊ महाराज पितळे यांचे कृपापात्र शिष्य संत बुलाखीदास उर्फ लोटांगण महाराज यांच्या रोहडा ते पंढरपूर येथे जाणाऱ्या दिंडीची धुरा ह. भ. प. विनायकअप्पा महाराज डाखोरे यांच्याकडे समारंभपूर्वक सोपविण्यात आली. संत बाळाभाऊ महाराज यांच्या परंपरेत पंढरपूर येथे जाणाऱ्या एकूण सहा दिंड्या आहेत. यांपैकी तपोवन देवी संस्थान रोहडा येथील या दिंडीच्या चालक आणि वीणेकरी पदावर डाखोरे महाराज यांची नियुक्ती झाल्यानंतर मेहकरच्या बाळाभाऊ महाराज गुरूपीठ, नरसिंह संस्थानच्या वतीने प्रा. डॉ. श्रीहरी महाराज पितळे यांनी वीणा आणि अधिकारपत्र देऊन मान्यता दिली. सर्व ग्रामस्थांनी लिखित स्वरूपात या नियुक्तीस मान्यता दिली. लोटांगण महाराज यांनी गुरूआज्ञेनुसार सुरू केलेली ही दिंडी भोसले महाराज यांनी आजवर सांभाळली. त्यांच्यानंतर आता गुरुपीठाधीश ड रंगनाथ महाराज पितळे यांचे आदेशानुसार नियुक्त सर्व दिंडीचालक आणि कार्यकारी मंडळींनी निष्ठेने दिंडी चालवावी, नामस्मरणात



वाटचाल करावी आणि सोबतच्या सर्वांची काळजी घ्यावी अशी आशा डॉ पितळे महाराज यांनी बोलताना व्यक्त केली. यावेळी नरसिंह संस्थानचे विश्र्वस्त आशिष उमाळकर, संदीप कुटे, राजेश राऊत उपस्थित होते. बीड जिल्ह्यातील डोंबरी येथील दिंडीकरी वारकऱ्यांसह गावातील गजानन कळंगे मदन पंडित सुरेश सोरमारे रामकृष्ण सोरमारे दिपक कळंगे पुरषोत्तम तायडे पुंजाजी लव्हाळे भीमराव तळेकर उमेशअप्पा चित्राळे सर्व मान्यवर उपस्थित होते

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# प्रत्येक शासकीय विभागाने नियोजन समितीच्या निधीमधून केलेल्या चांगल्या कामांची यादी तयार ठेवावी : पालकमंत्री चंद्रकांत पाटील

**✻ प्रत्येक वेळी सोलापूर जिल्हा दौऱ्यावर आल्यानंतर नियोजन निधी मधून केलेल्या चांगल्या कामांची पाहणी करणार ✻ सर्व शासकीय विभागांनी विधानसभा आचारसंहिता लागण्यापूर्वी सन २०२३–२४ ची सर्व कामे पूर्ण करावीत, तर सन २०२४–२५ च्या मंजूर कामांचे कार्यारंभ आदेश द्यावेत ✻ आज अखेर पर्यंत जिल्ह्यात समाधानकारक पाऊस झाल्याने पिण्याच्या पाण्याचे नियोजन व्यवस्थित करावे, ७४ कोटीच्या पाणीटंचाई कृती आराखड्यास मान्यता ✻ सोलापूर महापालिकेने दुहेरी पाईपलाईनचे काम नोव्हेंबर २०२४ अखेरपर्यंत पूर्ण करावे ✻ पिक विमा कंपनीकडून शेतकऱ्यांना पीक विम्याच्या आग्रिमची सर्व रक्कम मिळेल याची खात्री करावी ✻ कृषी विभागाने जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मुबलक बियाणे व खते यांचा पुरवठा करण्याबाबत दक्षता घ्यावी ✻ वीज वितरण कंपनीने दुरुस्तीचे कामे त्वरित पूर्ण करावीत, निधी अभावी कोणतेही काम राहणार नाही याची दक्षता घ्यावी ✻ शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयास अद्यावतीकरण करण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करणार**




**सोलापूर/ दैनिक यशसिध्दि न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधीः प्रत्येक शासकीय विभागाला त्यांच्या विभागाअंतर्गत विविध विकास कामे करण्यासाठी जिल्हा नियोजन समिती मधून निधी उपलब्ध करून देण्यात येतो. जिल्हा वार्षिक योजना सन २०२३–२४ अंतर्गत उपलब्ध करून दिलेल्या निधीतून प्रत्येक विभागाने केलेल्या चांगल्या दहा कामांची यादी तयार करून ठेवावी. या सर्व कामांना आपण प्रत्यक्ष भेट मंजुरी प्रमाणे कामे पूर्ण झाली आहेत का तसेच कामांचा दर्जाही तपासणार असल्याची माहिती उच्च व तंत्र शिक्षण, वस्त्रोद्योग व संसदीय कार्यमंत्री तथा पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली.

नियोजन समितीच्या सभागृहात आयोजित सर्व विभागप्रमुख, पाणीटंचाई व अन्य विभागांच्या आढावा बैठकीत पालकमंत्री चंद्रकांत पाटील मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, खासदार प्रणिती शिंदे, खासदार धैर्यशील मोहिते पाटील, आमदार सुभाष देशमुख, आमदार समाधान आवताडे, पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अप्पर जिल्हाधिकारी मोनिकासिंग ठाकुर, निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, उपजिल्हाधिकारी महसूल अमृत नाटेकर, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता संजय माळी यांच्या सह सर्व संबंधित विभाग प्रमुख उपस्थित होते.

पालकमंत्री पाटील पुढे म्हणाले की जिल्हा वार्षिक योजना सन २०२३–२४ अंतर्गत माहे मार्च २०२४ अखेरपर्यंत सर्व संबंधित शासकीय विभागाने त्यांच्याकडील मंजूर निधी जवळपास शंभर टक्के खर्च केलेला दिसून येत आहे. तर सन २०२४–२५ च्या जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत ७०२ कोटीचा आराखडा मंजूर असून त्यातील २३३.८१ कोटी प्राप्त झालेले आहेत. तरी सर्व संबंधित विभाग प्रमुखांनी विधानसभा आचारसंहिता लागण्याची शक्यता गृहीत धरून माहे ऑगस्ट २०२४ पर्यंत जास्तीत जास्त कामे निविदा प्रक्रिया पूर्ण करून कार्यारंभ आदेश देऊन ते सुरू करण्याबाबतची कार्यवाही अधिक गतिमान करावी. शिक्षण विभागाने प्राथमिक शाळा दुरुस्तीवर अधिक खर्च करून सर्व शाळा व्यवस्थित कराव्यात. तसेच सर्व नगरपालिकांना देण्यात आलेला निधी मंजूर कामावर व्यवस्थित खर्च होत आहे का याबाबत जिल्हा प्रशासन अधिकारी नगरपालिका यांनी प्रत्येक आठवड्याला ऑनलाइन बैठक घ्यावी, असे निर्देशही त्यांनी दिले.

जिल्ह्यात पावसाने समाधानकारक सुरुवात केलेली असून दिनांक १ जून २०२४ ते आज पर्यंत उजनी धरणाच्या पाणी साठवण क्षमतेत ७ टीएमसी पाण्याची भर पडली आहे. सद्यस्थितीत वजा ४६.७१ टक्के पाणी उजनी धरणात उपलब्ध आहे. तर प्रखर टंचाई कालावधीत २१४ टँकर जिल्ह्यात सुरू होते ते चांगल्या पावसामुळे १२७ टँकर पर्यंत कमी झालेले आहेत. पुढील काळातही चांगला पाऊस होऊन टँकरची संख्या शून्यावर येईल. तरीही जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी उपलब्ध पाणी जपून वापरावे, असे आवाहन पालकमंत्री पाटील यांनी केले. त्याबरोबरच ७४ कोटी ३५ लाख ३८ हजाराच्या टंचाई कृती आराखड्यास त्यांनी मान्यता प्रदान केली.

सोलापूर महापालिकेने दुहेरी पाईपलाईनचे उर्वरित २० टक्के काम माहे नोव्हेंबर २०२४ अखेर पूर्ण करून सोलापूर शहराला नियमित पाणीपुरवठा करण्याच्या अनुषंगाने प्रयत्न करावेत. पाणी वितरण व्यवस्था तसेच नगरोउत्थान अंतर्गत घेण्यात आलेल्या कामासाठी आवश्यक तेवढा निधी उपलब्ध करून देण्यात येईल, असे पालकमंत्री पाटील यांनी सांगून सोलापूर महापालिका व वीज वितरण कंपनीने परस्परात योग्य समन्वय ठेवून पाणीपुरवठ्यासाठी आवश्यक असलेला वीज पुरवठा सुरळीत राहील याची दक्षता घ्यावी असेही त्यांनी सुचित केले.

यावर्षी पावसाने समाधानकारक सुरुवात केली असल्याने कृषी विभागाने शेतकऱ्यांना बी बियाणे व पुरेसा खत पुरवठा करणे आवश्यक आहे. नियमित डीएपी खत पुरेसे उपलब्ध होत नसेल तर लिक्विड डीएपी खत वापरण्याबाबत शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करावी. मागील वर्षीच्या दुष्काळातील पीक विम्याचे २५ टक्के आग्रीम रक्कम ११३ कोटी शेतकऱ्यांना विमा कंपनीकडून मिळालेले आहेत, तरी उर्वरित रक्कम मिळण्यासाठी पाठपुरावा करावा. राज्य शासनाने एक रुपयात पिक विमा योजना लागू केल्यामुळे राज्यभरातील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद देऊन पीक विमा भरून पिक नुकसानी पासून सुरक्षित केलेली होती. सोलापूर जिल्ह्यातील पाच लाख आठ हजार शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घेतलेला आहे. तरी जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी यावर्षी पिक विमा भरण्यासाठी कृषी विभागाने प्रयत्न करावेत असे निर्देश श्री. पाटील यांनी दिले.

वीज वितरण कंपनीने दुरुस्ती तसेच फ्युज पोल पडणे, लाईन खाली पडणे, तुटणे या बाबीच्या अनुषंगाने आवश्यक उपाययोजना राबवून सर्व नागरिक व शेतकऱ्यांना सुरळीत वीज पुरवठा करण्याची दक्षता घ्यावी. दुरुस्तीची कामे करत असताना निधी उपलब्ध करून देण्यात येईल. आवश्यक निधीची मागणी नियोजन समितीकडे तात्काळ करावी, असे निर्देश पालकमंत्री पाटील यांनी दिले. शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयास अद्यवतीकरण करण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध केला जाईल त्यासाठी तंत्रनिकेतने प्रस्ताव करून पाठवावा. तसेच तंत्रनिकेतनचे रूपांतर शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात करण्यासाठी आवश्यक प्रस्ताव करून शासनाला सादर करावा, अशाही सूचना त्यांनी दिल्या. यावेळी उपस्थित लोकप्रतिनिधी यांनी उजनी पाणी उपलब्धता, पाऊस, खते बी बियाणे, पिक विमा, पी एम किसान योजना, वीजपुरवठा सुरळीत असणे, सोलापूर शहर दुहेरी पाईप लाईन, वितरण व्यवस्था, ड्रेनेज सिस्टीम सह नागरिकांच्या विकासाबाबतचे प्रश्न्न व सूचना मांडल्या. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सर्व संबंधित विभागाकडून कामे वेळेत पूर्ण करून घेण्यात येतील असे सांगितले. तसेच ज्या विभागांना नियोजन समिती मधून निधी आवश्यक आहे त्यांनी तात्काळ प्रस्ताव सादर करावेत असेही सूचित केले. तर जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता संजय माळी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तात्रय गावसाने, महापालिका उपायुक्त आशिष लोकरे, जिल्हा प्रशासनाधिकारी नगरपालिका विना पवार, वीज वितरण कंपनीचे कार्यकारी अभियंता श्री. शिंदे यांनी आपल्या विभागाच्या वतीने सर्व कामे वेळेत पूर्ण करण्याची खात्री दिली.

# रेशीम उद्योगास चालना देण्यासाठी शासन कटीबद्ध : पालकमंत्री चंद्रकांत पाटील

**✻ पालकमंत्र्यांच्या हस्ते हिरज येथे रेशीम कोष बाजारपेठ इमारतीचे उद्धाटन व कोनशिला अनावरण ✻ मौजे हिरज येथील रेशीम कोष बाजारपेठेमुळे रेशीम उत्पादक शेतकऱ्यांना लाभ मिळणार ✻ पालकमंत्री यांच्या हस्ते रेशीम कोष बाजारपेठ इमारत परिसरात वृक्षारोपण**



**सोलापूर/ दैनिक यशसिध्दि न्यूज**

कृषी क्षेत्रात नवनवीन तंत्रज्ञान येत असून शेतकऱ्यांनी हे तंत्रज्ञान आत्मसात करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे शेतकऱ्यांनी पारंपारिक पिकांऐवजी कमी संसाधनात जास्तीत जास्त उत्पादन देणाऱ्या नवीन पिकांचे प्रयोग शेतात राबवले गेले पाहिजेत. तुती लागवड किंवा रेशीम उत्पादन हा एक चांगला पर्याय शेतकऱ्यांसमोर आलेला असून रेशीम शेतीमध्ये राज्यातील शेतकरी मोठ्या प्रमाणावर आकर्षित होत आहेत. राज्य शासन ही रेशीम उद्योगास चालना देण्यासाठी कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले.

रेशीम कोष बाजारपेठ मौजे हिरज–रेशीम पार्क इमारतीचे उद्धाटन व कोनशिला अनावरण पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी आयोजित रेशीम शेतकरी कार्यशाळेमध्ये ते बोलत होते.

यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, आमदार सुभाष देशमुख, उपसचिव श्रध्दा कोचरेकर, सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरु प्रकाश महानवर, प्रादेशिक सहायक संचालक कविता देशपांडे, आत्माचे प्रकल्प संचालक शीतल चव्हाण, रेशीम विभागाचे उपसंचालक महेंद्र ढवळे, जिल्हा कृषी अधीक्षक कृषी अधिकारी गावसाने, रेशीम विकास अधिकारी विनित पवार, एम. ए. कट्टे, रेशीम उत्पादक शेतकरी आदि उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. पाटील म्हणाले, जिल्ह्यातील शेतकरी रेशीम उत्पादन घेण्यासाठी पुढाकार घेत आहेत. शेतकऱ्यांनी कृषी क्षेत्रातील नव तंत्रज्ञानाचा वापर करून आपली आर्थिक उन्नती घडवून आणावी यासाठी कृषी विभाग व सर्व संबंधित शासकीय यंत्रणांनी शेतकऱ्यांमध्ये जागृती करावी. कृषी संलग्न नाविन्यपूर्ण उपक्रमासाठी शासन स्तरावर सर्वोत्तपरी प्रयत्न करणार असून यासाठी आवश्यक असलेले प्रस्ताव यंत्रणांनी त्वरित सादर करावेत असेही त्यांनी सूचित केले.

तसेच हिरज येथील रेशीम बाजारपेठेमुळे सोलापूर जिल्ह्यासह परिसरातील अन्य जिल्ह्यातील रेशीम उत्पादक शेतकऱ्यांना हक्काची बाजारपेठ मिळाली असून याचा शेतकऱ्यांना चांगला फायदा मिळणार आहे. शासन ही महारेशीम अभियानाच्या माध्यमातून राज्यातील शेतकऱ्यांमध्ये तुती लागवडी बाबत जागृती करत आहे. जिल्ह्यासह राज्यातील सर्व रेशीम उत्पादक शेतकऱ्यांच्या अनुदानाच्या अनुषंगाने प्रलंबित असलेले प्रस्ताव शासन स्तरावरून त्वरित निकाली काढण्याचे अनुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे. शासन खंबीरपणे रेशीम उत्पादक शेतकऱ्यांच्या पाठीशी असल्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यावेळी म्हणाले, सोलापूर जिल्ह्यातील वातावरण डाळींब व रेशीम उत्पादनासाठी फायदेशीर आहे. शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांच्या अडचणी व समस्या जाणून घेतल्या आहेत. रेशीम अनुदानाचे प्रलंबित प्रस्ताव लवकर मार्गी लागण्यासाठी प्रयत्न करत आहे. जिल्हा वार्षिक योजनेच्या माध्यमातून आवश्यक ती सर्व मदत रेशीम उद्योगास चालना मिळण्यासाठी करणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

आमदार सुभाष देशमुख यांनी यावेळी रेशीम बाजारपेठ कार्यान्वित केली असून आता शेतकऱ्यांनी उत्पादन वाढीकडे लक्ष देण्याची अपेक्षा व्यक्त केली. तसेच रेशीम उद्योगास मनरेगा योजना लागू असल्यामुळे शेतकऱ्यांनी जॉब कार्ड काढून घ्यावेत अशी रेशीम उत्पादक शेतकऱ्यांना त्यांनी आवाहन केले.

रेशीम विभागाचे उपसंचालक श्री. ढवळे यांनी तसेच रेशीम उत्पादक शेतकरी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी रेशीम उद्योग पुस्तिकेचे प्रकाशन पालकमंत्री महोदयांच्या हस्ते झाले. प्रारंभी दीप प्रज्वलन करून व कोनसिला अनावरण करून पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते रेशीम मार्गदर्शन कार्यशाळा तसेच रेशीम बाजारपेठ इमारतीचे उद्धाटन करण्यात आले. या इमारतीच्या परिसरात पालकमंत्री यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक रेशीम विकास अधिकारी विनित पवार यांनी केले. आभार प्रदर्शन व समारोप श्री. कट्टे यांनी केले.

# स्वेरीच्या आसावरी चव्हाण यांची 'रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड' या कंपनीत निवड

**पंढरपूर /दैनिक यशसिध्दि न्यूज**

'रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड' या बहुराष्ट्रीय कंपनीने घेतलेल्या मुलाखतीत गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग या महाविद्यालयाच्या मेकॅनिकल इंजिनिअरिंग या विभागातील आसावरी भिमराव चव्हाण यांची कॅम्पस ड्राईव्ह मधून निवड करण्यात आली आहे.' अशी माहिती संस्थेचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांनी दिली. मुंबई येथील 'रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड' (आरआयएल) या बहुराष्ट्रीय कंपनीच्या निवड समितीने निवड प्रक्रियेच्या अंतिम फेरीतून स्वेरीच्या मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागात अंतिम वर्षात शिक्षण घेणाऱ्या आसावरी भिमराव चव्हाण या विद्यार्थीनीची निवड केली असून त्यांना वार्षिक रु. ७.५ लाख इतके पॅकेज मिळाले आहे. 'रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड' ही एक नामांकित कंपनी आहे. डिप्लोमा इंजिनिअरिंग उत्तीर्ण झाल्यानंतर आसावरी भिमराव चव्हाण यांनी पुढील शिक्षणासाठी पंढरपूरचे स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग निवडले. अत्यंत कष्टाने शिक्षण घेऊन हे यश मिळविले. विद्यार्थ्यांचे परिश्रम, शिक्षकांचे प्रयत्न आणि स्वेरीतील शैक्षणिक कल्चर यामुळेच स्वेरीतील विद्यार्थ्यांना अधिक प्रमाणात नोकरीच्या संधी उपलब्ध होत आहेत आणि त्यातून स्वेरीवर असलेला पालकांचा विश्र्वास आणखी दृढ होत आहे. स्वेरी अभियांत्रिकीमध्ये विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्या प्लेसमेंट साठी येत असतात आणि कंपनीसाठी पात्र अशा विद्यार्थ्यांची निवड करत असतात. त्यामुळे विविध आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये स्वेरीचे विद्यार्थी आपले उत्तम करिअर घडवीत आहेत. या विद्यार्थ्यांना स्वेरी मध्ये विविध प्रकारचे प्रशिक्षण दिले जाते. त्यामध्ये ॲप्टिट्यूड, कम्युनिकेशन स्किल, एडवॉन्सड टेक्निकल ट्रेनिंग, मॉक इंटरव्यूव, ग्रुप डिस्कशन, सॉफ्टवेअर ट्रेनींग या व्यतिरिक्त जागतिक स्तरावर संधी मिळण्यासाठी जापनीज लैंग्वेज ट्रेनींग तसेच जीआरई, टोफेल या संदर्भात मार्गदर्शन केले जाते. सदर विद्यार्थ्यांना ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागातील तज्ञ प्राध्यापकांचे व विभागातील प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले. शिक्षण पूर्ण होण्यापूर्वीच विद्यार्थ्यांना नोकरीची संधी उपलब्ध होत असल्याने विशेषतः पालक वर्गात आनंदाचे वातावरण पसरले आहे. संस्थेचे संस्थापक सचिव व प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे, संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख तसेच संस्थेचे विश्र्वस्त व पदाधिकारी, स्वेरी कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम.पवार, उपप्राचार्य डॉ. सौ. मिनाक्षी पवार, स्वेरी अंतर्गत असलेल्या इतर महाविद्यालयांचे प्राचार्य, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांच्यासह पालकांनी कॅम्पस इंटरव्युवमधून निवड झालेल्या आसावरी चव्हाण यांचे अभिनंदन केले.




# निफाड येथे खा.राहुल गांधी यांचा जन्मदिन फळवाटप करून साजरा

**निफाड/दैनिक यशसिध्दि न्यूज**

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस मा.अध्यक्ष, खा.राहुलजी गांधी यांच्या जन्मदिनानिमित्त निफाड तालुका काँग्रेस कमिटी व महिला काँग्रेसच्या वतीने उपजिल्हा रुग्णालय निफाड येथे रूग्णांना फळेवाटप करून साजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे प्रस्ताविक काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस सुहास सुरळीकर यांनी केले. तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष विजय जाधव यांनी शुभेच्छा व्यक्त केल्या. कार्यक्रमासाठी मा. अध्यक्ष व श्रीमाणकेश्र्वर वाचनालयाचे अध्यक्ष मधुकर शेलार , काँग्रेस कमिटीचे कार्याध्यक्ष साहेबराव ढोमसे,महिला काँग्रेस अध्यक्ष जयश्रीताई शेळके, सेवा दलाचे प्रकाशजी अडसरे, माधवराव निचित किसान सेलचे शामराव शिंदे,मधुसूदन आव्हाड, उपजिल्हा रुग्णालयाचे अधीक्षक राजीव तांबाळे,भारत निफाडकर ,जयश्री कर्डक, आरती ठोके ,मालती कराटे, मनिषा गायकवाड,मीना माळी सह कार्यकर्ते उपस्थित होते .रुग्णांनी फळ वाटप कार्यक्रम बद्दल समाधान व्यक्त केले उपस्थितांचे आभार मधुकर शेलार यांनी मानले



# स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे बैठक

**पंढरपूर/दैनिक यशसिध्दि न्यूज**

करमाळा तालुक्यातील स्वाभिमान शेतकरी संघटनेची तालुका कार्यकारणी विभागाच्या निवडी गुरुवारी दिनांक २० ६ २०२४ रोजी करमाळी स्वाभिमानी शेतकरी संघटना कार्यालय जिम मैदान येथे अकरा वाजता करण्यात येणार आहे स्वाभिमानी शेतकरी संघटना ही सर्वसामान्य जास्त व शेतकरी यांच्यावर होणारे अन्यायविरुद्ध लढणारी संघटना आहे तरी करमा ळा तालुक्यातील कार्यकारिणींच्या कार्यकाळ संपला असल्याने कार्यकारणी बरखास्त करण्यात आली होती या कार्यकारिणीच्या निवडी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजू शेट्टी यांच्या आदेशानुसार काहीतरी करमाळा तालुका कार्यकारणी निवडीसाठी शेतकरी व स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते व कार्यकर्ते तसेच पदाधिकारी यांनी उपस्थित राहावे असे आवाहन स्वाभिमानी शेतकरी संघटनेने सोलापूर जिल्हा कार्याध्यक्ष रवींद्र गोडगे यांनी केले आहे



# पत्रकार दिलीप गंभीरे यांच्या बोरवेल मधून मोटार पंपाशिवाय पाण्याचे सुमारे २०० फूट हवेत कारंजे

**कळंब/सुधाकर रणदिवे**

कळंब तालुक्यातील ईटकुर येथे निसर्गाचीच कृपा झाली म्हणावी लागेल. पत्रकार दिलीप गंभिरे यांच्या शेतामध्ये दहा वर्षांपूर्वी शेतात खोदलेल्या कुपनलीकेतून (बोअरवेल) मधून मोटर पंपाशिवाय पाण्याचे सुमारे २०० फूट हवेत कारंजे उडत होते. सोमवार दि.१७ ईटकुर परिसरात जोरदार पाऊस झाला होता. कळंब तालुक्यातील ईटकुर येथील शेतकरी दिलीप गंभीरे यांनी शेती सिंचनासाठी आपल्या दोन हेक्टर शेतात १० वर्षापूर्वी ४५० फूट बोअर घेतले होते. या बोअरला साडेतीनशे फूट अंतरावर भरपूर पाणी लागले, त्यात त्यांनी साडेसात व्हार्स पावरचे मोटरपंप बसविले तेव्हापासून आपल्या शेतीचे सिंचन करून इतर लोकांच्या शेतीत पाणीपुरवठा करून त्यांच्या शेतीची ही सिंचन व्यवस्था केली आहे. गावापासून केवळ अडीच किलोमीटर अंतरावर शेती असल्याने २०१६ साली कळंब तालुक्यातील गावात प्रचंड दुष्काळ पडला असता संपूर्ण शेतीसाठी याच बोअर मधून पाणी देण्यात येत होते. दरम्यान यात काळात बोअर आटले, त्यामुळे या बोअरचा शेतकरी गंभीरे यांनी नाद सोडून दिला. सोमवारी सायंकाळी साडेचार वाजता अचानक बोअरवेल मधून ऑटोमॅटिक पाणी पाणी चक्क २०० फुट पाण्याचे कारंजे जवळपास दोन तास उडत होते. याची व्हिडिओ क्लिप ही सोशल मीडियावर व्हायरल झाली आहे. पावसाचा लहरीपणा आणि सतत पडणारा दुष्काळ यामुळे या भागात पाणीटंचाई जाणवत आहे. दहा वर्षांपूर्वी बंद पडलेल्या बोअरमधून पाण्याचे फवारे उडत होते शेतातील पीक वाचवण्यासाठी शेतकऱ्यांची धडपड सुरू आहे. अनेक ठिकाणी हजारो रुपये घालून शेतकरी बोअर घेताना दिसत आहेत कळंब तालुक्यातील पाण्याची पातळी खोल गेले आहे ५०० फूट बोअर घेऊनही पाणी लागेल याची गॅरंटी नाही काही बोअर तर त्यापेक्षा जास्त खोल घेऊनही कोरडे जात आहेत. ईटकुर शेतकरी गंभीरे यांची शेती असून त्यांनी पाणी समस्या सोडवण्यासाठी शेतात बोअर घेतला सोमवारी अचानक बोरमधून दोनशे फूट पाण्याचे फवारे उडत होते.



# सत्कार तालुकाध्यक्ष यांचा...

**महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबई शाखा अक्कलकोट अध्यक्ष पदी तिसऱ्यांदा कमलाकर सोनकांबळे यांचे बिन विरोध निवड झाल्याबद्दल विविध संघटनेच्या वतीने सत्कार करण्यात आले**



**रिपाइं आठवले गटाच्या वतीने** : महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या अक्कलकोट तालुका अध्यक्षपदी कमलाकर सोनकांबळे यांची फेरनिवड झाल्याबद्दल रिपब्लिक पक्ष व रासप यांच्या वतीने सत्कार करून शुभेच्छा देण्याचा आल्या यावेळी रासपचे पश्चीम महाराष्ट्र उपाध्यक्ष सुनिल दादा बंडगर,ढ्ढख तालुका अध्यक्ष अविनाश मडीखांबे ,ढ्ढख पश्चिम महाराष्ट्र नेते प्रा. राहूल रूही शुभम मडीखांबे,रवी सलगरे करण गायकवाड आदी उपस्थित होते



महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबई शाखा अक्कलकोट तालुकाध्यक्ष पदी पुनश्र्च निवड झाल्याबद्दल मानव सेवा फाउंडेशन अक्कलकोट तालुक्याच्या वतीने सत्कार करून शुभेच्छा देण्यात आले यावेळी अध्यक्ष दत्ता कांबळे, अँड अमोल बनसोडे , शाम बाबर,महादेव सोनकवडे , मकबूल कणमुसे यासह मित्र परिवार उपस्थित होते




महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबई शाखा अक्कलकोट तालुकाध्यक्ष पदी पुनश्र्च निवड झाल्याबद्दल मकबूल कणमुसे मित्र परिवारातर्फे सत्कार करून शुभेच्छा देण्यात आले यावेळी मकबूल कणमुसे, दत्ता व्हदलुरे, असलम मुल्ला यासह मित्र परिवार उपस्थित होते



महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबई शाखा अक्कलकोट तालुकाध्यक्ष पदी पुनश्र्च निवड झाल्याबद्दल सागर दादा युवा मंच अक्कलकोट तालुक्याच्या वतीने सत्कार करून शुभेच्छा देण्यात आले यावेळी कल्याणराव बिराजदार , शाम बाबर,महादेव सोनकवडे , सुनील सावंत, मकबूल कणमुसे यासह मित्र परिवार उपस्थित होते



महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबई शाखा अक्कलकोट तालुकाध्यक्ष पदी पुनश्र्च निवड झाल्याबद्दल महादेव सोनकवडे वतीने सत्कार करून शुभेच्छा देण्यात आले यावेळी महादेव सोनकवडे मकबूल कणमुसे दत्ता व्हादलुरे यासह मित्र परिवार उपस्थित होते



महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबई शाखा अक्कलकोट तालुकाध्यक्ष पदी पुनश्र्च निवड झाल्याबद्दल भाजपा तालुका उपाध्यक्ष प्रदीप जगताप वतीने सत्कार करून शुभेच्छा देण्यात आले



महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबई शाखा अक्कलकोट तालुकाध्यक्ष पदी पुनश्र्च निवड झाल्याबद्दल गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठान अक्कलकोट तालुक्याच्या वतीने सत्कार करून शुभेच्छा देण्यात आले यावेळी परमेश्वर अरबाळे सर, नवनाथ धस ,निजप्पा गायकवाड, यासह मित्र परिवार उपस्थित होते



महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबई शाखा अक्कलकोट तालुकाध्यक्ष पदी पुनश्र्च निवड झाल्याबद्दल साहेबलाल सुभेदार वतीने सत्कार करून शुभेच्छा देण्यात आले



महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबई शाखा अक्कलकोट तालुकाध्यक्ष पदी पुनश्र्च निवड झाल्याबद्दल असलम मुल्ला मित्र परिवार किरनळी वतीने सत्कार करून शुभेच्छा देण्यात आले यावेळी प्रदीप जगताप, साहेबलाल सुभेदार, पद्माकर भंडारे, अस्लम मुल्ला, शाम बाबर,महादेव सोनकवडे , रमेश सावंत, मकबूल कणमुसे यासह मित्र परिवार उपस्थित होते



महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबई शाखा अक्कलकोट तालुकाध्यक्ष पदी पुनश्र्च निवड झाल्याबद्दल महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने सत्कार करून शुभेच्छा देण्यात आले

# पंढरपूर युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष संदीप शिंदे यांनी पंढरपुरातील चोरी गेलेल्या स्वच्छतागृहांसाठी केले आंदोलन

**पंढरपूर/दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष संदीप शिंदे यांच्या वतीने सहा महिन्यापूर्वी पंढरपुरातील चोरी गेलेल्या मुताऱ्या (स्वच्छतागृह) याच्याबद्दल पंढरपूर नगरपालिकेचे मुख्याधिकारी



प्रशांत जाधव साहेब यांना निवेदन देण्यात आले होते त्यावेळेस जाधव साहेबांनी बर बघू दोन महिन्यांमध्ये करतो असं आश्वासन दिले होते मात्र दोन महिन्यानंतर अनेकदा गेलो तेव्हा अजून सांगितले एक महिन्यांमध्ये करतो असं सहा महिने त्यांनी आम्हाला गाजर दाखवायचं काम केले त्याचा निषेध म्हणून पंढरपूर शहर युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष संदिप शिंदे यांच्या नेतृत्वाखाली आज बुधवार दिनांक १९ जून रोजी झोपेचे सोंग घेणाऱ्या नगरपालिका प्रशासनाला जाग करण्यासाठी अनोख्या पध्दतीने आंदोलन करत हलगी व बोंबाबोंब आंदोलन करण्यात आले यावेळी नगरपालिकेचे उपमुख्याधिकारी सुनील वाळवजकर यांनी आंदोलनकर्त्यांना लेखी स्वरूपात एक महिन्यांमध्ये काम करतो असं सांगितले मग आंदोलन मागे घेण्यात आले .


या आंदोलनाला प्रमुख उपस्थिती काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अमर सूर्यवंशी, जिल्हा उपाध्यक्ष नागेश गंगेकर , सचिव राजाभाऊ उराडे सेवादल शेहराध्यक्ष गणेश माने विधानसभा उपाध्यक्ष सोमनाथ अरे सोशल मीडिया शहराध्यक्ष महेश अधटराव जिल्हा उपाध्यक्ष सुहास भाळवणकर अल्पसंख्याक जिल्हा उपाध्यक्ष बबलू रत्नपारखे युवक उपाध्यक्ष रवी अग्रवाल संग्राम मुळे देवानंद इरकल शिवकुमार बावलेकर आरपीआय उपाध्यक्ष अनिल माने व भाजी विक्रेता महिला महानंदा आळसुंदे मनीषा आस्वारे सुमन तरंगे पवार नागराबाई पवार भाजी विक्रेता महिला व काँग्रेसचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# न्यासाकडून सुरु असलेले अन्नछत्र अतिशय सुंदर उपक्रम असून, योग्य नियोजन, स्वच्छता : उपजिल्हाधिकारी शेळके

**अक्कलकोट/दैनिक यशसिध्दि न्यूज**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाकडून सुरु असलेले अन्नछत्र अतिशय सुंदर उपक्रम असून, योग्य नियोजन, स्वच्छता व भक्तीभाव जपून चालविला जात असल्याचे मनोगत विठ्ठलरुक्मिणी मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी राजेंद्र शेळके पंढरपूर यांनी व्यक्त केले.

ते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात आले असता न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. या वेळी ते बोलत होते.



त्यांच्या समवेत पंढरपूर विठ्ठलरुक्मिणी देवस्थान समितीचे सुशीलकुमार ढेकळे-पाटील, अमित नवाळे, वैभव पोतदार, नारायणराव वाघ हे उपस्थित होते.यावेळी न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, विश्वस्त भाऊ कापसे, संतोष भोसले, सौरभ मोरे, शहाजीबापू यादव, निखील पाटील, प्रवीण घाडगे, गोटू माने, दत्ता माने, बलभीम पवार, बाळासाहेब पोळ, बाळासाहेब घाटगे, शरद भोसले, प्रसाद हुल्ले, महांतेश स्वामी, धनंजय निंबाळकर, विशाल घाटगे, तानाजी पाटील, अनिल बिराजदार, शावरेप्पा माणकोजी, मल्लिनाथ कोगनुरे, यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.